# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

MERC/ADM/RTI/027/2021/**0293** Dt. 07.07.2021

प्रति,
श्री. जगनसिंह राजपूत (जेष्ठ नागरीक),
ओमसाई निवास, बॅरेक नंबर ८,
रूम नं. ४, उल्हासनगर-१,
जि. ठाणे - ४२१००१

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. १२.०५.२०२१ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि.१९.०५.२०२१ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| १ | आपल्या राज्यामध्ये विद्युत लोकपाल २००५ पासून आजपावेतो कोण होते व त्यांना कोणत्या आधारे नियुक्त करण्यात आल्याची लिस्ट आजपावेतो मिळावी. | आपणांस आवश्यक असलेली माहिती विद्युत लोकपाल यांच्या www.mercombudsman.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. (माहितीची प्रत सोबत जोडली आहे एकूण ३ पृष्ठे) |
| ३ | आपल्या विज नियामक आयोगाच्या नियमामध्ये २००५ पासून १ न्यायाधिश (विद्युत लोकपाल) दोन न्यायव्यवस्थेचे कार्य पाहत आहे त्याची २००५ पासून आजपावेतो नावासह लिस्ट स्वाक्षरी मिळावी. | |
| २ | आपल्या विज नियामक आयोगाच्या कोणत्या नियमामध्ये १ न्यायाधिश (विद्युत लोकपाल) २ न्यायव्यवस्थेचे कार्य पाहू शकते त्याचा जिआरची स्वाक्षरी प्रत मिळावी. | आपण विचारलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरूपाची आहे तसेच सदर कायदा हा काल्पानिक प्रश्न उपस्थित करण्याची किंवा जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रश्नांची उत्तरे शोधून देणे अपेक्षित नाही.<br><br>तरी देखील आपण महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २०२० चे अवलोकन करावे. सदर विनियम आयोगाच्या www.merc.gov.in या संकेतस्थळावर मोफत स्वरूपात उतरवून घेण्याकरिता उपलब्ध करण्यात आलेले आहेत ** |
| ४ | आपल्या विज नियामक आयोगाच्या नियमाप्रमाणे कोणत्याही न्यायव्यवस्थेचे पद ३ महिना अतिरिक्त रिक्त ठेवण्यात येऊ नये असा नियम असताना आपल्या विद्युत लोकपाल व ग्राहक तक्रार मंच झोनचे ३ महिन्यापेक्षा जास्त रिक्त ठेवल्यास जबाबदारी विज वितरण कंपनीची राहील की विज नियामक आयोगाची त्याची जिआरची प्रत स्वाक्षरी मिळावी. | |

**Please note that above Regulations and details is available in public domain on the Commission website in downloadable format on www.merc.gov.in. As per the Hon'ble CIC decision No. CIC/YA/A/2014/000379/SB Dated 19.09.2016 in the matter of Shri. K. Lall Vs M. K. Bagri, Assistant Registrar of Companies and CPIO, Appeal No. CIC/AT/A/2007/00112, dated 12.04.2007, since the same is available in public domain, the PIO is not obliged to provide the same to the appellant under the RTI Act.

माहितीचा अधिकार कायदा, २००५ नुसार आपणास ३० दिवसात माहिती उपलब्ध करून देणे आवश्यक होती परंतू, संपूर्ण राज्यात कोवीड-१९ संसर्ग महामारीच्या प्रादुर्भावामुळे आपणास वेळेत माहिती पाठविण्यास विलंब झाला याची नोंद घ्यावी.

माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये श्री अनिलकुमार उके, संचालक (विधी) प्रभारी /प्रथम अपीलीय अधिकारी आहेत. पत्ता:- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर १, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई - ४००००५. दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३९६४ / ६५/ ६९ **Email: anilkumar.ukey@merc.gov.in**

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी